फॅक्स नंबर ९१-७२३२-२४४१४

श्री. वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व अति.रुग्णालय यवतमाळ

SHRI.VASANTRAO NAIK GOVT.MEDICAL COLLEGE, & SUPER SPE.HOSPITAL YAVATMAL

जा.क.शावैमवरुय/ निविदा दरपत्रक/ 10994/2024 दिनांक :- 8 /10/2024

# जाहिर दरपत्रक सुचना

श्री वंसतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, व रुग्णालय/स्त्री रुग्णालय व अतिविषेशोपचार रुग्णालय यवतमाळ हया चारही संस्थेकरीता एकत्रीत पुरवठरदाराकडून करण्यात येणा-या विविध वस्तू/साहीत्य ईत्यादी करिता आयकर (TDS) प्रति तिमाही त्यांच्या (PAN) खात्याला जमा करणे व अधिकारी, कर्मचाऱ्यांचे फार्म नंबर १६ तयार करुन देणे इत्यादीबाबत कामकाज पारपाडून त्या बाबतच्या अभिलेख कार्यालयास उपलब्ध करुन देण्याकरीता त्यांचे दर एक वर्ष कालावधी करीता दर निश्चित करुन ठेवण्याकरीता ईच्छुक पुरवठादाराकडुन व्दि लिफाफा पध्दतीने दरपत्रक मागविण्यात येत आहे. सदर कालावधी दर निश्चिती आदेश निघाल्याच्या दिवसापासून एक वर्षाच्या कालावधीकरीता राहील.

**१.तांत्रीक लिफाफा:-**

अ.निविदाधारक हा नोंदणीकृत ॲडव्होकेट किंवा सनदी लेखापाल(असोसिएट) असावा.

ब.शासकीय/निमशासकीय कामकाज केल्याबाबतचा किमान ३ वर्षाचा अनूभव प्रमाणपत्र जोडावा.

क.निविदाधारकाचे जीएसटी प्रमाणपत्र, पॅन कार्ड, आधारकार्ड या कागदपत्राची छायांकित जोडावे.

ड. सदर लिफाफा मोहरबंद करण्यात यावा त्यावर स्पष्ट शब्दात तांत्रीक बाबीचा लिफाफा असे नमूद करुन स्व:ताचे नाव व पत्ता लिहावा व मोहरबंद करावा.

इ.लिफाफामध्ये पुरवठादारने नोंदनीकृत लायसन जोडण्यात यावा.

**२.किमंतीचा लिफाफा:-** ज्यामध्ये दर नमुद असलेला कागद स्वाक्षरी व सहीनिशी टाकण्यात यावा. यावर स्पष्ट शब्दात किमंतीचा लिफाफा असे नमूद करुन स्व:ताचे नाव व पत्ता लिहावा व मोहरबंद करावा.

उपरोक्त दोन्ही लिफाफे एका मोठया लिफाफा मध्ये टाकून दरपत्रक अधिष्ठाता श्री. वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, रुग्णालय, स्त्री रुग्णालय व अतिविशेषोपचार रुग्णालय, यवतमाळ यांचे नावे सादर करावयाचे असून दरपत्रकाच्या लिफाफावर रुग्णालयाकरीता आवश्यक असलेल्या वरीलप्रमाणे दरपत्रक असे स्पष्ट नमुद करण्यात यावे. स्व:ताचे नाव व पत्ता लिहावा अशाप्रकारे तयार करण्यात आलेले दरपत्रक दि.१५.१०.२०२४ रोजी दुपारी ०१:०० वाजेपर्यत कार्यालयात आणून देण्यात यावे. तांत्रीक लिफाफा मध्ये दराचा उल्लेख करु नये. दर आढळल्यास दरपत्रक अग्राहय धरण्यात येईल.

प्राप्त होणाऱ्या दरपत्रकातील तांत्रीक लिफाफे दि.१५.१०.२०२४ रोजी दुपारी ०४:०० वाजता महाविद्यालयाच्या मा. अधिष्ठाता सभागृहामध्ये उघडण्यात येईल. अटी व शर्ती नुसार व सर्व कागदपत्रे योग्य आढळल्यास किंमतीचा लिफाफा उघडण्यात येईल. तांत्रीक बाबीची पुर्तता

Scanned with OKEN Scanner

झाली नसल्यास संबधीत पुरवठादाराचे दर पत्रक रदद समजण्यात येईल. व त्याचे किंमतीचे लिफाफे उघडण्यात येणार नाही. इच्छूक पुरवठादारास सदर सभेस हजर राहता येईल.

जिथे दर द्यावयाचे नाही तिथे इच्छूक नाही असे स्पष्ट नमूद करावे ती जागा सोडण्यात येऊ नाही. सर्व दर हे मासीक करीता सर्व कर समाविष्ट करुन नमूद करावे. अपुर्ण माहितीसह प्राप्त होणारे दरपत्रक नाकारायचे अधिकार अधिष्ठाता यांनी राखून ठेवलेले आहे. तसेच यादीमधील काही बाबी किंवा मागविण्यात येणाऱ्या संपूर्ण दरपत्रकाची रदद करण्याची प्रक्रिया अधिकार अधिष्ठाता यांनी राखून ठेवलेला आहे. खालील यादीमधील वस्तू लक्षात आले नसेल ते पाहण्यासाठी अंदाजपत्रक विभागास उपलब्ध आहे ते आपण पाहू शकता.

तसेच दर हे पेनने लिहण्यात येऊ नाही. ते प्रिंट केलेले असावे. हस्ताक्षरात लिहलेले दरपत्रक रदद करण्यात येईल. दर निश्चिती झाल्यावर आवश्यकतेनुसार वेळोवेळी आदेश काढण्यात येईल. सदर दरपत्रकासंबधी आपणास काही तक्रार या कार्यालयास दाखल करावायाची असेल तर प्रथम या कार्यालयात तक्रारसंबधी रुपये १०,०००/- शासनखाती जमा करावे लागेल. जर आपण दाखल केलेली तक्रारारीत काही तथ्य आढळून आल्यास आपणास आपण शासन खाती जमा केलेली १०,००० रुपये रक्कम परत करण्यात येईल. तक्रारीमध्ये काही तथ्य न आढळल्यास रुपये १०,००० रक्कम परत करता येणार नाह. व ती रक्क्म शासनखाती जमा करण्यात येईल.करीता खालील प्रमाणे दरपत्रके मागविण्यात येत आहे.

| अ.क्र | विवरण | दर |
|---|---|---|
| ०१ | पुरवठरदाराकडून करण्यात येणा-या विविध वस्तू/साहीत्य ईत्यादी करिता आयकर (TDS) प्रति तिमाही त्यांच्या (PAN) खात्याला जमा करणे व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे फार्म नंबर १६ तयार करुन देणे. | |

अधिष्ठाता
श्री.वसंतराव नाईक शासकिय वैद्यकिय महाविद्यालय
,रुग्णालय, स्त्री रुग्णालय व अति.रुग्णालय
यवतमाळ.

Scanned with OKEN Scanner